(सारांश- Synopsis)

दिव्यांगासाठीच्या शासकीय योजना व कायद्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्यविद्या शाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयात पीएच्.डी.(Ph.D.) प्राप्त करण्यासाठी प्रस्तुत

शोध प्रबंधाचा आराखडा

- : संशोधक :-

सचिन दामू सूर्यवंशी

लातूर

- : मार्गदर्शक :-

प्रा. डॉ. ए. टी. लेंढवे

प्रमुख, राज्यशास्त्र विभाग

शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय, रेणापूर, लातूर

ऑगस्ट- २०२१

दिव्यांगासाठीच्या शासकीय योजना व कायद्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

प्रस्तावनाः

जगभराचा आढावा घेता असे आढळते की, जगातील सर्वांत मोठया अल्पसंख्यांक समुदायापैकी एक गट हा दिव्यांग / अपंगांचा आहे. पण हा गट इतका असुरक्षित आहे की, समाजाचे यांकडे वारंवार दुर्लक्ष होते, नव्हे तर यांचे शोषण केले जाते, त्यामुळे ते वंचित तथा बहिष्कृत राहतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात, बहुतांश देशांनी शारिरीक विकलांगता असणाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष पुरवण्यास सुरुवात केली. देणग्या व संस्थांच्या मदतीवर ह्या समुदायाला उपचार व पुनर्वसन देत असतानाच, शासकीय व अशासकीय मदतीने मानवी हक्क पुरवण्यास प्रारंभ झाला. स्वातंत्र्योत्तर काळात या समुहाची जबाबदारी सर्वतोपरी आपली असल्याचे भारत सरकारने मान्य केले व त्यानुसार विकलांग व्यक्तींच्या कल्याणार्थ व पुनर्वसनार्थ अनेक कार्यक्रमांची आखणी केली. दिव्यांगाने बऱ्याच प्रकारच्या अडचणी येत असतात. मानसिक, शारिरीक आणि सामाजिक अशा प्रकारचे अडथळे समाजात समाविष्ट होण्यापासून त्यांना प्रवृत्त करतात. पहिल्या प्रकारचा अडथळा, समाजाच्या नकारात्मक प्रवृत्तीमुळे उत्पन्न होतो. समाज मनात विकलांगतेबद्दलचा डाग पुसला जात नाही. त्यानुसार शरीराची अक्षमता ही कर्मामुळे प्राप्त झालेली असते. पूर्वजन्मीच्या कृत्यांमुळे देवाने दिलेली ही शिक्षा असून त्याबाबत कुणालाही काही करण शक्य नाही. याचा परिणाम म्हणजे हे लोक समाज आणि अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात त्यांना रोज दैनंदिन जीवनामध्ये झुंजावे लागते. बऱ्याच गोष्टी सहन कराव्या लागतात. या अनुभवाची कटु फळे त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयाचे जीवनमान त्रस्त करतात. यातील बरेचसे लोक एकलकोंडे होतात, समाज त्यांना नकोसे झाल्याची व या समाजावर त्यांचा भार असल्याची जाणवी देतो. त्यांच्या कुटुंबीयांना, अर्थात पालक-मुले व भावडांनाही नकारात्मक भावनांना, दारिद्र्याला आणि सामाजिक बहिष्कृततेला सामोरे जावे लागते. बऱ्याच लोकांना असे वाटते की, जो काळ समाजाकडून पाठिंबा मिळण्यात जावयाचा तो प्रदीर्घ काळ समाजाशी लढण्यात व्यतित झाला आहे. वाळीत टाकणे म्हणजे समाजीवानातून व्यक्तिशः परस्पर संबंधातून व समाज पातळीतून त्याच्या गरजा भागविण्यापासून संपूर्णतः वगळणे अगदी बहिष्काराची परिसीमाच होय. उघडपणे ही

गोष्ट सर्वच पातळयांवर घडते. ह्या गटाला ज्या अळथळयांचे जे चक्र पार करून जावे लागते त्या चक्राला भेदणारे इतरही सामाजिक घटक आहेत. जसे जात, वंश धर्म मूळस्थान, प्रांत आदी. या दुहेरी वर्गवारीतून, भेदांतून त्यांना फिरावे लागते. विकलांगता आणि लिंगभेद या दोन्ही गोष्टी मानव म्हणून जगताना पंगु करतात. सर्वसामान्य समाजव्याख्यांची पूर्तताही विकलांग मनुष्य करू शकत नाही. पौरुष म्हणजे शक्ती, शारिरीक क्षमता व स्वातंत्र्य मात्र दिव्यांग पुरुष या गोष्टी दर्शवू शकत नाही तर दिव्यांग स्त्री देखील गृहिणी, पत्नी आणि आई म्हणून स्वीकारली जाण्यात अयशस्वी ठरते. तथा शरीरिक पातळीवरील स्त्री सौंदर्यांची व्याख्याही पूर्ण करू शकत नाही. शतकानुशतके शारिरीक, मानसिक व सामाजिक पातळीवर दिव्यांग समूह निव्वळ दुर्लक्षित, शाब्दिक शोषणास व शारीरिक त्रासास लैंगिक शोषणास बळी पडला आहे.

कर्णबधीर मुले व गतीमंद, दिव्यांग मुले, सभोवतालच्या लोकांशी संवाद साधू शकत नाहीत, नवी मैत्री प्राप्त करताना अनेकदा त्यांच्या आत्मसन्मानाला तडा जातो व समाजात त्यांची स्वीकृती बरीच अयशस्वी ठरते. सगळयात मोठी तसेच मूळ समस्या अशी आहे. की, अपंग बांधवांचा एकलकोंडेपणा व चिंतातूरता यामध्ये वाढ होत आहे. याचे कारण संवादाचा अभाव होय. तर दुसऱ्या बाजूला, दृश्य आणि अगतिशील अशा अपंग बांधवाच्या समस्या समाजाच्या सहजपणे लक्षात येतात. आणि समाज त्याकडे साहनुभूतीपूर्वक पाहतो. समाजाचे वर्तनही त्यानुसार होते. म्हणून सजग अशा समाजाला अपंग बांधवांशी सुसंवाद साध्यण्याची संधी दिली पाहिजे आणि अशा तऱ्हेने अपंग व्यक्तींना समाजाच्या मूळ प्रवाहात आणले पाहिजे.

समाजात अपंगाची संख्या खूप असली तरी अनेक अपंग व्यक्तीनी आपल्या शारीरीक मानसिक व्याधीवर मात क रून स्वताचे सामर्थ्य सिध्द क रून दाखविले आहे.प्रसिध्द शिक्षिका हेलन केलर मेंदुज्वरामुळे अपंग झाल्या पण त्यानी त्यावर मात करत उच्च शिक्षण पूर्ण केले आणि अमेरिकेच्या विद्यापीठात प्राध्यापक लेखीका आणि समाजसेविका म्हणून नाव कमावले. तसेच लुई ब्रेल याल वयाच्या ३ वर्षी अपघाताने अंधत्व आले पण त्याने आपल्या इच्छाशक्तीच्या बळावर ब्रेल लीपीचा शोध लावला केवळ बोटाच्या स्पर्शाने वाचली जाणारी ब्रेल लीपी तयार केली आणि असंख्य आपल्या अधंबाधवासाठी ज्ञानाचा प्रकाश खुला केला.त्याचप्रमाणे जागतिक पातळीवर शास्त्रीय नृत्य आणि अभीयानात किर्ती संपादन करणारी जयपूर फुट या कृत्रिम पायाच्या जोरावर तिने हे साध्य केले तसेच दक्षिण अफ्रीकेचा ब्लड

रनर याला पोटयाखाली पाय नव्हते त्याही स्थितीत अपंगाच्या ऑलिम्पिकमध्ये १००. २००. आणि ४०० मीटर रन मध्ये सुवर्णविजेता ठरला. तसेच स्टीफन हॅकिंग या भौतिकशास्त्रज्ञाला स्नायूचा असाध्य अजार होता त्याला कुठलिही हालचाल करता येत नव्हती तरीही त्याने आपल्या बुध्दीमत्तेचया जोरावर भौतिक शास्त्रातील सृष्टीची निर्मिती यावर मौलिक संशोधन केले आणि जागतिक नावलौकीक मिळविला. क्रिकेट क्षेत्रातील चंद्रशेखर याचा उजवा हात पोलीओग्रस्त होता त्याचाच कुशलतेने वापर करून फिरकी गोलदांज म्हणून प्रसिध्द पावला त्याचप्रमाणे मन्सूर अलीखान पतोडी याचा कार अपघातात उजवा डोळा गेला पण त्याने जिददीने त्या क्षेत्रात उत्तम क्षेत्ररक्षक आणि कप्तानपद संभाळले याचाच अर्थ अपंगत्व म्हणजे अक्षमता नाही १९८७ साली महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हातील बंदेनवाझ हा तर जन्मजात अपंग त्याला हात नव्हतेच लहापणी त्याला पाहण्यासाठी खूप गर्दी व्हायची त्याच्या आजीला हे खटकायचे म्हणून तिने त्याला पाहण्यासाठी तिकट ठेवले आसा हा बंदेनवाझ त्याने जिददीने पायाच्या सहायाने चित्रकला स्विमीग कला अवगत केली आज तो प्रथीतयश चित्रकारआहे आणि महिना ३० हजार रू कमावून त्याच्या कुंटुबांचे पालनपोषण यशस्वीपणे करत आहे इतकेच नव्हे तर उत्तम पोहतो गाडी चालवतो आणि मोबाईल देखील रिपेअर करतो दोन्ही हातानी अपंग असून देखील त्याने त्याचे उज्जवल भविष्य त्याच्या पायाने लिहीले तो म्हणतो की तुमची इच्छा शक्ती दांडगी असेल तयारी असेल तर तुम्हाला यशस्वी होण्यापासून कोणीही आडवू शकत नाही

संशोधन विषयाचे महत्त्व :

ज्या लोकांना अपंगत्व आहे, अशा लोकांच्या स्थितीस ते स्वतःच जबाबदार आहेत अशा तऱ्हेची भाषा वापरली जाते. त्यांना शैक्षणिक तसेच रोजगार विषयक संधी नाकारल्या जातात. एवढेच नव्हेतर इतर समाजाशी अर्थपूर्ण नाते जोडण्यासही प्रतिबंध केला जातो. त्यांच्यावर कुचकामी असा शिक्का मारण्यात येतो आणि समाजावर ते भार आहेत, अशी संभावना करण्यात येते. अपंगत्व व दिव्यांगामुळे समाजाला तसेच अर्थ व्यवस्थेला योगदान देऊ शकत नाहीत, हे खरे असले तरी त्यांना योग्य ते सहाय्य दिले तर ते आपले योगदान पूर्णपणे देऊ शकतात. आजचा विचार करता यातील अनेकजण रोजगारापासून दूर आहेत. त्यांच्यामध्ये असलेल्या क्षमतेचा आणि कौशल्याचा एक वर्ग तयार झाला आहे. आपण त्यांच्या या संभाव्य कौशल्याचा व क्षमतेचा वापर करू शकलो तर आपोआपच नवीन आशादायी वातावरण निर्माण होऊ शकेल. अपंगांना त्यांचे रोजगार विषयक अधिकार देऊन त्यांना

मिळवते करुन सक्षम बनविण्याऐवजी कुटुंबाकडून तसेच शासनाकडून परावलंबित्वाचे जीवन बहाल केले जाते. त्यांच्या तरुणपणाच्या काळात कठीण आर्थिक परिस्थिती लादली गेल्यामुळे वार्धक्याकाळ अंधकारमय होतो. अशा तऱ्हेने अपंगांच्या वार्धक्याबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण होते.

शासकीय धोरणाचा जो मसुदा तयार केला जातो. त्यामध्ये विविध प्रकारच्या लोकांमध्ये असलेल्या भिन्न भिन्न गरजांचा विचार केला गेला पाहिजे. वस्तुत तसे होत नाही. अनेकदा अपंग लोकांच्या अपंगत्वाच्या विविधतेच्या दृष्टीने विचार केला जात नाही. त्यांच्याशी सल्लामसलत केली जात नाही. अनेकवेळा असे होते की, अपंगांना आपण व्यवस्थेशी लढत आहोत असे वाटते. यामुळे त्यांना व्यवस्था त्रोटक वाटते, गुंतागुंताची वाटते किंवा नोकरशाहीधार्जिणी वाटते. त्याचप्रमाणे ती अपंगांच्या गरजा केंद्रस्थानी ठेवून केलेली नाही असेही वाटते. आपल्याकडील ही राजकीय आणि वैधानिक प्रक्रिया ही, अलगतावाद जोपसणारी, अपंगजनतेला नगण्य स्थान देणारी वाटते. याचा परिणाम यांना समाजातून बहिष्कृत केल्याप्रमाणे वाटते.

आज समाजात अपंगाना कमी पणाची वागणूक दिली जाते हे निश्चितच लाजिवाणी आणि माणूसकीला काळीमा फासणारी बाब आहे.अपंग व्यक्तीना समान अधिकर आणि समान संधी व लोकशाहीत पूर्ण सहभाग असावा या विषयी कायदेशीर हाक्क असावा त्यासाठी अपंगासाठी झटणाया अनेक संघटना शासनाच्या दारामध्ये खेटा मारत आहे पण अपेक्षित यश मिळाले नाही ही खेदाची गोष्ट आहे.३ डिसेंबर हा जागतिक अपंग दिन म्हणून ओळखला जातो व त्यासाठी विविध कार्यक्रम घेतले जातात पण अपंगाना समान संधी कधी मिळणार हा मोठा गहन प्रश्न आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारानुसार १९९२ ला अपंग व्यक्तीना समान अधिकार देण्याचा कायदा संमत करण्यात आला भारतात केंद्र सरकारने हा कायदा अपंगाना समान संधी आणि लोकशाहीत सहभाग ही दोन्ही कलमे वगळून २७ डिसेंबर १९९५ ला हा कायदा समंत केला पण यामध्ये अनेक त्रृटी होत्या या बाबत मुबई हायकोर्टात याचिका दाखल केली गेली आणि याची दखल घेत हायकोर्टाने अपंगाना समान सधी देण्याचे आदेश दिले पण यालाही केराची टोपली दाखवली गेली आदेशाचे पालन आणि अमंलबजावणी मस्तवाल सरकारने केली नाही त्यासाठी अपंग साधना संघ यासारखे अनेक संघटना पाठपुरावा करत आहे.

दिव्यांगा व्यक्तींची स्थिति :

संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १९९२ पासून ३ डिसेंबर हा दिवस अपंगाचा दिवस म्हणून घोषित झालेला आहे. अपंगाचे प्रश्न जाणून घेवून त्यांच्या उद्धारासाठी हातभार लागावा तसेच समाजातील अन्य लोकांना मिळावी म्हणून हा दिवस पाळला जातो. विविध उपक्रमांद्वारे निधी उभारला जावा म्हणून या दिवसाची योजना आहे. आज जगातील दहा टक्के लोकसंख्या म्हणजेच ६५ कोटी लोक कोणत्याना कोणत्या रूपाने अपंग आहेत. जागतिक आरोग्य संघटनादेखील अपंग बांधवाच्या जीवनाची गुणवत्ता वाढावी म्हणून प्रयत्नशील असते. शारीरिक मानसिक विकलांग व अंध व्यक्तींच्या समस्याही भिन्न असतात. विकलांगाना नवनवीन आव्हाने व अडथळ्यांना सामोरे जावे लागते.

संपुर्ण जगात अपंगाची संख्या दर दिवसाला वाढत आहे. अपंगाच्या अधिकाराचे सक्षण व्हावे, त्यांचा दर्जा उंचावणे, त्यांना जगण्यास प्रेरणा मिळावी, त्यांच्या समस्यांची समाजाला जाण व्हावी या उद्देशाने ३ डिसेंबर हा जागतिक अपंग दिन म्हणून साजरा केला जातो. जगात जवळपास १५ करोड लोक नेत्रहीन आहेत. , १३५ करोड लोक अल्पदृष्टी दोषाने ग्रस्त आहेत. १२३ करोड लोक बहीरे आहेत तर मतीमंदांची व्यापकता दर ३० हजार प्रति व्यक्ती एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात अपंग व्यक्तिंची संख्या मोठ्या प्रमाणात असून त्यांचे पुनर्वसन होणे अत्यंत आवश्यक आहे.

भारतातील अपंगाबाबत एक धक्कादायक माहिती समोर येते. ती म्हणजे ५ ते १९ वयोगटातील १७.०१ % अपंग विद्यार्थी आतापर्यंत एकदाही शाळेत गेले नसल्याचे दिसून येते. युनेस्कोने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या २०११ च्या जनगनणेच्या आधारे आपल्या अहवालातून असे निष्कर्ष काढले आहेत की, राष्ट्रीय स्तरावर २७.००% अपंग विद्यार्थी एकदाही शाळेत गेलेले नाहीत. आसाममधील विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असून ते ३६.०४ % एवढे आहे. महाराष्ट्रात ६ लाख ८४ हजार ३२८ अपंग विद्यार्थी असून त्यापैकी १७.०१ % विद्यार्थी एकदाही शाळेत गेले नसल्याचे तर कधीतरी शाळेत गेलेल्या मुलांचे प्रमाण १२.०६ % एवढे आहे. अपंग विद्यार्थी शाळेत जाण्याच्या प्रमाणात महाराष्ट्र राष्ट्रीय स्तरावर तिसऱ्या स्थानी आहे. पहिल्या स्थानी गोवा असून त्याचे प्रमाण ७३.०२ % एवढे आहे. वरिल राज्ये वगळता जवळपास सर्व राज्यामध्ये शाळेत न गेलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण २०.०० % हुन अधिक आहे.

राज्यामध्ये सन २००१ च्या जनगणनेनुसार २९ लाख ६४ हजार अपंग व्यक्ती आहे. देशात ही संख्या २.१९ टक्के च्या आसपास आहे लोकसंख्येच्या २.१३ टक्के हे प्रमाण आहे

त्यामध्ये दृष्टीहीन कर्णबधीरता मानसिक विकंलाग शारीरीक विकलांग इ प्रमाण अधिक आहे. असे दोष असणारे अपंगाचे प्रमाण ग्रामीण भागात आधिक आहे. अपंग कल्याण हा विषय राज्याच्या कक्षेतील असल्याने त्याविषयीचे सर्वस्व धोरण ठरवून आणि त्याची अमंलबजावणी करण्याचे काम राज्यसरकारचे आहे पण याबाबत अक्षम्य चालढकल करण्यात आली याबाबत अपंग कल्याण आयुक्तालयाने पाठपुरावा केला पण याबाबत त्यानाही कोणताही प्रतिसाद मिळत नाही तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाकडून त्याच्या उत्पन्नाच्या तीन टकके वाटा अपंगासासाठी राखीव ठेवण्याचा नियम व कायदा आहे त्याप्रमाणे तो ठेवला जातो पण त्याचा परिणामकारक वापर अपंगाच्या कल्याणासाठी होत नाही वास्तविक अपंगाच्या क्षेत्रात खूप काम करण्याची गरज आहे पण ते होत नाही ही कटू असले तरी सत्य आहे.तसेच अपंगाच्या कर्मशाळेमधून अपंगाना विविध व्यवसाय व उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते त्याना कागद काम पुठठाकाम खडू बनविणे कागदी फुले बनविणे पेपर बॅग बनविणे पेपर डिश आणि मेणबत्ती इ पारंपरीक प्रशिक्षण दिले जाते पण त्याना रोजगार मिळत नाही रोजचा दैनदिन खर्च सुध्दा भरू न निघत नाही त्यांना शिकविले जाणारे कोर्स हे आय टी आय च्या धर्तीवर रोजगार क्षेत्रात मागणी निर्माण करणारे असावे कारण त्याना दिल्या जाणाया प्रशिक्षणामध्ये आधुनिकतेचा व अद्यावयत तंत्राचा अभाव आहे कालसुसंगत पणा नाही त्यामुळे कालबाहय प्रशिक्षणामुळे रोजगार मिळत नाही आधुनिक बाजाराचा कल पाहून अपंगाच्या प्रशिक्षणात आणि अभ्यासक्रमात मोठे बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे.

अपंग किंवा दिव्यांगाचा अर्थ-

अपंगत्व म्हणजे, व्यक्तिची जन्मजात किंवा तद्नंतर उद्भवलेली शारिरिक दुर्बलता किंवा कमजोरी होय. शारिरिक हानीमुळे व्यक्तीच्या कार्यक्षमतेत कमतरता येते. एखाद्या व्यक्तीचे अपंगत्व म्हणजे अशी परिस्थिती की, ज्यात व्यक्तीचे वय, लिंग, सामाजिक व सांस्कृतिक स्तरावर त्याला जी कार्ये करण्याची अपेक्षा आहे ती कार्ये करित असताना तो असमर्थ ठरतो किंवा काही अडचणी निर्माण होतात या स्थितीला अपंगत्व असे म्हणतात. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हटले तर, अपंग व्यक्ती चालणे, बोलणे, पहाणे, लिहिणे, वजन उचलणे, समजने व समजून घेणे, निर्णय घेणे किंवा जवळपासच्या वस्तू आणि व्यक्तींच्या आवडीमध्ये समस्या निर्माण होणे म्हणजे अपंगत्व होय.

अपंगत्वांचे मुख्य प्रकार

१) शारीरीक हालचाल करण्यास अक्षम (Locomotor Disability)

२) आंधळेपणा(Visual Disability)

३) मूकबधीरपणा (Speech & Hearing Disability)

४) मतिमंद (Mental Retrdation)

५) कुष्ठरोगी (Leprocy Cured)

६) शिक्षण घेण्यात अक्षम (Learning Disability)

अपंगत्वाचे मुख्य प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

१) दृष्टिदोष २) कर्णबधिर ३) मतीमंद ४) मानसिक दुर्बलता

५) वाचादोष ६) अस्थिव्यंग ७) बधिरता/बहुविकलांग ८) कुष्ठरोग

९) सिक्लसेल

संशोधनाचे उद्देश :

संशोधनाचे खालीलप्रमाणे उद्देश निश्चित करण्यात येणार आहेत.

१. दिव्यांगाबद्दल माहिती जाणून घेणे.

२. विकलांग व्यक्तीसाठी आसणाऱ्या शासकीय कायद्याचा अभ्यास करणे.

३. विकलांगाच्या सुरक्षीततेसाठी निर्माण केलेल्या प्रशासकीय योजनांचा आढावा घेणे.

४. विकलांगाच्या परिस्थितीत सुधारणा व्हावी याकरीता स्वयंसेवी संस्थाची भूमीका अभ्यासणे.

५. विकलांगाबाबत ग्रामीण आरोग्य केंद्राची भूमिका अभ्यासणे.

गृहितकृत्ये :-

१. शासकीय कायद्यामुळे विकलांग व्यक्तीला सुरक्षीतता प्राप्त होत आहे.

२. प्रशासकीय योजनामुळे विकलांग व्यक्तीच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनमानात सुधारणा होत अहे.

३. विकलांग व्यक्तींना शैक्षणिक सुविधा प्राप्त करून दिल्यामूळे त्यांच्यात जागृती होत आहे.

४. ग्रामीण आरोग्य केंद्रात विकलांग व्यक्तींना वेळेवर सुविधा प्राप्त करून दिली जात आहे.

५. दिव्यांगासाठी शासनाने दिलेल्या ३ टक्के आरक्षणाची अमलंबजावणी होत नाही.

६. दिव्यांगाना समाजात म्हणावा तसा सन्मान मिळत नाही.

संशोधन पद्धती :

सदर प्रबधासाठी द्वितीय साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला असून त्यात संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील अग्रलेख, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करून निश्चित केलेल्या उद्देशानुसार तयार करण्यात येणार आहे.

दिव्यांगासाठीच्या विविध योजना व कायदे :

निसर्गाने ज्यांच्या आयुष्यात काहीतरी उणिव ठेवलीच अशा विलकांगांचं आयुष्य म्हणजे कायमच झगडणे असते. त्यांना आधाराशिवाय आपले दैनंदिन व्यवहार पार पाडता येत नाहीत. ते स्वावलंबनाने आपल्या पायावर उभे राहतात. धडधाकट व्यक्तींना अचंबित करणारी कामगिरी करून दाखवतात. त्यांना जगण्याची कसरत करताना अनेक अडथळे पार पाडावे दाखवतात. त्यांची काळजी घेणे हे सुदृढ समाजाची जबाबदारी असते. अस्थिव्यंग असलेल्या मुलांना प्रवास करताना कोणाची तरी मदत होण्याशिवाय गत्यंतर नसतं. घराबाहेर पडणं हेच त्रासदायक असते. त्यामुळे समाजापासून आपोआप अशी मुलं दुरावली जातात. ३० टक्के किंवा ४० टक्के व्यंग असणारी विकलांग बस किंवा ट्रेनने प्रवास करून शकतात. परंतु ५० टक्क्याहून अधिक व्यंग असणारी मुलं आधाराशिवाय प्रवास करू शकत नाहीत. मोठ्या वस्तीत राहणाऱ्या विकलांग मुलांना सार्वजनिक शौचलयाचा वापर करावा लागतो. त्यांच्यासाठी ही खूप अवघड गोष्ट असते. त्यांच्यासाठी त्या परिसरात स्वतंत्र शौचालयाची सुविधा त्यांच्या संख्येनुसार करण्यात यावी.

भारतीय राज्यघटनेनुसार सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य, न्याय आणि प्रतिष्ठेचे आश्वासन देण्यात आले आहे. घटनेनुसार अपंगाच्या सक्षमीकरणाची थेट जबाबदारी राज्यशासनावर सोपविण्यात आली आहे. घटनेच्या २५३ व्या कलमातील संघराज्य सूचीतील १३ क्रमांकाच्या मुद्यामध्ये अधिनियमीत केले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात सुमारे २.६८ कोटी लोक विविध प्रकारचे अपंग आहेत. शारीरिक अपंगत्वामुळे सहजपणे चालणे, फिरणे, प्रवास करणे, दैनंदिन कामकाज करणे अवघड होते. बहिरेपणामुळे ऐकणे व बोलणे यात अडचणी येतात. अंध व्यक्तीला मुक्त संचार करणे सहज शक्य होत नाही.

अपंगाच्या कल्याणसाठी व सर्वांगिण विकासासाठी राज्याने सर्वव्यापी धोरण आखणे व त्याची काटेकोरपणे अमंलबजावणी कशी होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे तरच अपंगाना न्याय मिळेल व मानवी हक्क उपभोगण्याचा आनंद प्राप्त होईल.अपंग धोरणामध्ये खालील बाबीचा समावेश करावा

१ देशातील प्रत्येक अपंगाकरीता ७००० रू इतकी निवृत्ती वेतन चालू करावे

२ २०१६च्या कायदयानुसार अपंगाना ५ टकके इतके आरक्षण असावे

३ अपंगाना बॅटरीवर चालणाया गाडया द्याव्यात

४ तालुका पातळीवर अपंगासाठी वसतीगृह असावीत

५ तालुका पातळीवर प्रशिक्षण आणि करमणूक क्रेद आसावे

६ अपंगाचे सक्षमीकरणासाठी प्रशासकिय पातळीवर अधिकारी असावे

७ अपंगाना देशात विमान बस आणि रेल्वे प्रवास १०० टकके विनामुल्य असावा

८ देशातील सर्व हॉस्पीटलमध्ये अपंगावर विनामुल्य उपचाराची सोय व्हावी.

९ अपंग कलावंत खेळाडू यासाठी शासनाने संस्कृती मंडळ स्थापन करावे इ सारख्या अनेक बाबीचा समावेश करता येईल.

दिव्यांगासाठी शासनाच्या विविध योजना :

समाजातील दृष्टीहीन, कर्णबधीर, अस्थिव्यंग, मनोविकलांग व कुष्ठरोगमुक्त अपंग व्यक्तीकडे त्यांच्या अपंगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्याकडे पाहून त्याच्यामधील असलेले सुप्त सामर्थ्य विकसित करून त्यांना समाज जीवनाच्या सर्व अंगामध्ये समान संधी, संपूर्ण सहभाग व त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय तसेच तइर विविध विभागामार्फत कल्याणकारी योजना राबविण्यात येतातृ सामाजिक सुरक्षिततेसाठी अपंगाना कांही क्षेत्रात आरक्षण, सवलती, सूट व प्राधान्य देण्यात आलेले आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी खालील योजना आहेत.

महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ : राज्यातील विकलांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध व्हावे. समाजातील दुर्बल, दुर्लक्षीत अपंगाच्या जीवनातील अंधःकार दूर करून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणावे या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने दि. ३ डिसेंबर, २००१ रोजी जागतिक अपंग दिनाचा मुहूर्त साधून 'महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. १९५६ च्या प्रमंडळ कायद्यानुसार या महामंडळाची स्थापना दि. २७ मार्च, २००२ रोजी स्थापना करण्यात आली. अपंगाच्या सर्वागिण विकासासाठी स्वतंत्र महामंडळाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचा अंगीकृत उपक्रम असणारे हे महामंडळ ही एक स्वायत्त संस्था असून महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ५०० कोटी रुपये आहे. अपंगाना पारदर्शक व तत्पर सेवा देता यावी म्हणून महामंडळाचे आय.एस.ओ. ९००१-

२००८ हे आंतरराष्ट्रीय प्रमाणिकरण करण्यात आलेले आहे. राज्यातील बेरोजगार अपंग बांधवाना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी अल्प व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणे त्याचप्रमाणे अपंगाच्या सर्वांगिण विकासासाठी विविध योजना राबविणे ही महामंडळाची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत.

- **आरोग्य :** अपंगत्व मुळातच येऊ नये म्हणून अपंग प्रतिबंधात्मक, अपंग व्यक्तीचे सर्वेक्षण, शालेय आरोग्य तपासणी, जनजागृती, माता बालसंगोपण कार्यक्रम, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य इत्यादी कार्यक्रम आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येतात.
- **अपंग विद्यार्थ्यांना विशेष शाळामार्फत शिक्षण :** अपंग विद्यार्थी अतितीव्र अपंगत्वामुळे सामान्य मुलांबरोबर सामान्य शाळेत येऊ शकत नाहीत. अशा विद्यार्थ्यांसाठी तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून दृष्टीहीन, कर्णबधीर, अस्थिविकलांगासाठी शिक्षणाची सोय केली जात आहे. या शाळा निवासी व अनिवासी स्वरूपाच्या असून निवास व भोजनाची विनामुल्य सोय असते.
- **व्यवसाय प्रशिक्षण देणे :** १८ ते ४५ या वयोगटातील प्रौढ अपंग व्यक्तींना सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगाच्या कार्यशाळेमधून रोजगार व स्वयंरोजगाराचे वेगवेगळ्या व्यवसायाचे मोफत प्रशिक्षण निवासी व अनिवासी देण्यात येते. राज्यात चार शासकीय कार्यशाळा आणि एक औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व ७८ स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या कार्यशाळा आहेत.
- **अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल देणे :** १८ ते ५० वयोगटतील दृष्टीहीन, कर्णबधीर, अस्थिविकलांग अपंग व्यक्तींना स्वयरोगाराही रु. १,५०,०००/- च्या व्यवसायासाठी ८० टक्के बँकेमार्फत कर्ज व २० टक्के कमाल रूपये ३०,०००/- अनुदान स्वरूपात दिले जाते.
- **अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे :** शारीरिक पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिविकलांग व्यक्तीसाठी कॅलिपर्स कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकल, कर्णबधिरांसाठी श्रवणयंत्र व अंध व्यक्तींना चष्मे, काठ्या तसेच इयत्ता दहावी नंतरचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी अंध विद्यार्थ्यांना टेपरेकॉर्डर व दहा कोऱ्या कॅसेटचे संच दिले जातात.
- **अपंग व्यक्तींना एस.टी. प्रवास भाड्यात सवलत देणे :** अपंग व्यक्तींना दिलेल्या ओळखपत्राच्या आधारे एस.टी.प्रवास भाड्यामध्ये अपंग व्यक्तीस ७५ टक्के व त्याच्या

सोबत्यास ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. यासाठी अपंगत्वाचे प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकाकडून प्राप्त झालेले असावे. तसेच ते ४० टक्केहून अधिक अपंगत्व असावे.

विकलांग व्यक्तीच्या पुनर्वसनासाठी कायदे :-

केंद्रसरकारने विकलांग व्यक्तीचे पुनर्वसन करण्यासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षीतता प्राप्त करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण कायद्याची निर्मिती केलेली आहे.

१. विकलांग व्यक्तीला समान हक्क सुरक्षा तसेच भागीदारीसाठी अधिनियम १९९५ मध्ये तयार करण्यात आलेला आहे. हा कायदा एक महत्त्वपूर्ण साधन असून विकलांगाची राष्ट्रीय निर्माण कार्यास समान संधी व पूर्ण भागीदारी निच्छित करेल. या कायद्यामध्ये पुनर्वसनासाठी निवाराणात्मक व विकासात्मक या दोन्ही बाजूवर भर देण्यात आलेला आहे.

२. मानसिक मतिमंद विकलांग आसणाऱ्या व्यक्तीला राष्ट्रीय कल्याण ट्रस्ट अधिनियम १९९९ नुसार कायद्याची सुरक्षा त्याचप्रमाणे स्वतंत्र जीवन जगण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे.

३. कायदेशीर संरचनात्मक सात राष्ट्रीय संस्थाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

❖ शारीरिक विकलांग संस्था नई दिल्ली.

❖ राष्ट्रीय दृष्टी विकलांग संस्था डेहराडून.

❖ राष्ट्रीय ॲथोपिडीक विकलांग संस्था कलकत्ता.

❖ राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्था सिंकदराबाद.

❖ राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्था मुंबई.

❖ राष्ट्रीय पुनर्वसन आणि अनुसंधान संस्था कटक.

❖ राष्ट्रीय बहु विकलांग सशक्तीकरण संस्था चेनई.

४. पुनर्वसक क्षेत्रामध्ये आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काही राष्ट्रीय संस्था आहेत. मानसिक स्वास्थ विज्ञान राष्ट्रीय संस्था आखील भारतीय शारीरिक चिकित्सा कायद्यात्मक दृष्टीने महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत.

५. कायद्यात्मक पुनर्वसन करताना प्रामुख्याने त्याला तिन प्रकारामध्ये विभक्त करता येईल.

प्रकरण मांडणी :

प्रस्तावना

प्रकरण पहिले

संशोधन पध्दती व साहित्याचा आढावा

प्रकरण दुसरे

दिव्यांग व्यक्ती स्वरुप, प्रकार व स्थिति

प्रकरण तिसरे

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा विश्लेषणात्मक अभ्यास

प्रकरण चौथे

दिव्यांगासाठीचे विविध कायदांचा विश्लेषणात्मक अभ्यास

प्रकरण पाचवे

दिव्यांग व्यक्तींच्या योजनां व कायद्याबाबत तथ्य विश्लेषण

प्रकरण सहावे

निष्कर्ष व शिफारशी

संदर्भसूची :

१. डॉ. मिश्र दयाकृष्ण, डॉ. राठौड ए. एस. १९९८ सामाजिक प्रशासन, (Social Administration) कॉलेज बुक डेपो, जयपुर

२. डॉ. जोसेफ आर. ए. २००५ पुनर्वास के आयाम, समाकलन पब्लिशर्स, वाराणसी

३. कौल जे. एल. शिक्षक - प्रशिक्षण - लेखमाला, ऑल इंडिया कन्फेडरेशन ऑफ दि ब्लाइंड, दिल्ली

४. डॉ. फडिया बी. एल. - डॉ. फडिया कुलदिप २००७ उच्चतर लोकप्रशासन, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा

५. मासिके - लोकराज्य, योजना, कुरुक्षेत्र

६. संकेत स्थळे व दैनिक वर्तमानपत्रे

७. महाराष्ट्र वार्षिकी २०१२ - संपादक तुकाराम जाधव, युनिक ४, युनिक ॲकॅडमी पुणे ३ २०१२

८. प्रा.व्ही.बी.पाटील - मानवी हक्क, के सागर पब्लिकेशन्स पुणे २०१२

९. डॉ.प्रतिभा पाटील व प्रा.अंबादास आरगडे - सामाजिक आणि आर्थिक प्रशासन आदित्य प्रकाशन लातूर २०१२

१०. डॉ.त्र्यंबक दुनबळे, जन माध्यम प्रसारण अधिकारी, अली यावरं जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थान, मुंबई

११. जोसेफ तुस्कानो : आंतरराष्ट्रीय अपंग दिन दैनिक महाराष्ट्र टाइम्स दि. ०३ डिसेंबर २०१०

१२. मा. संपादक : विकलांगांना हव्यात हक्काच्या सोयी दै. प्रहार, दि. ६ एप्रिल २०१४

१३. सुरेश वांदिले : अपंगासाठी प्रशिक्षण संधी दै. लोकसत्ता दि. २० एप्रिल २०१६

१४. मनोज पाटील, नागरिकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव, २०१४.

१५. प्रा. लक्ष्मण कोतापल्ले, भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन, समाजकार्य, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१४.

१६. अंपग कल्याण आयुक्तालय मुंबई - २०१६ वार्षीक अहवाल

१७. अपंगत्व म्हणजे अक्षमता नव्हे - महाराष्ट्र टाईम्स अग्रलेख दि ५-१२-२०१४

१८. महाराष्ट्र शासनाच्या अपंगाच्या कल्याणासाठी योजना - केशव गावीत

१९. चित्रकार बंदेनवाझ - कैफीयत - लोकसत्ता रविवार पुरवणी दि ३-१२-२००८

२०. अपंगाच्या समस्या आणि उपाय - प्रा सरला माहेश्वरी

२१. योजना, जुलै २०१७.

२२. योजना, ऑगस्ट २०१८

२३. https://www.india.gov.in

संशोधक **मार्गदर्शक**

सचिन दामू सुर्यवंशी

प्रा. डॉ. श्याम लेंढवे
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय,
रेणापूर, लातूर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत मानव्य विद्या शाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयात पीएच्.डी.(Ph.D.) प्राप्त करण्यासाठी प्रस्तुत शोध प्रबंधाचा आराखडा

दिव्यांगासाठीच्या शासकीय योजना व कायद्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास

संशोधकाचे नाव :- ***सचिन दामू सुर्यवंशी***

विषय : *राज्यशास्त्र*

मो. नं.:

प्रवर्ग :

पत्ता :

ई-मेल : @gmail.com

मार्गदर्शकाचे नाव : ***प्रा. डॉ. श्याम लेंढवे***

महाविद्यालयाचे नाव : प्रमुख राज्यशास्त्र विभाग
शिवाजी वरिष्ठ महाविद्यालय, रेणापूर, लातूर

मो. न. :

ई-मेल : @gmail.com